महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर § ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: mahajyotingp@gmail.com

जावक क्र.महाज्योती/२०२४/मातोश्री वस्ती/१०९४ दि.११/०७/२०२४

## मातोश्री मुलींचे वसतीगृह, नाशिक येथील महाज्योती संस्थेमार्फत निवड झालेल्या मुलींच्या प्रवेशाबाबत परिपत्रक

मा.जिल्हाधिकारी, नाशिक व छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शासन निर्णय क्रमांक: वसति ५३१७/प्र.क्र.९/मशि-२ दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ अन्वये मातोश्री मुलींचे शासकीय वसतिगृह, सरस्वती नगर, यात्रक फाटा, पंचवटी, नाशिक, येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यामार्फत मराठा, कुणबी, मराठा- कुणबी व कुणबी मराठा लक्षित गटातील ७५ मुलींसाठी व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर यामार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग गटातील ७५ मुलींसाठी तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ५० मुलींसाठी अशाप्रकारे लक्षित घटकातील एकुण २०० मुलींसाठी वसतिगृह सुरू करण्यात येत आहे.

वसतीगृह दि.०८.०३.२०२३ ते दि.१५.०९.२०२३ या कालावधीत अर्ज मागविण्यात आलेले होते. महाज्योती संस्थेकडे दि.१५.०९.२०२३ या अंतिम दिनांकापर्यंत एकूण ९८ अर्ज प्राप्त झालेले आहेत. अर्जांची तपासणी खाली नमूद केलेल्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात आलेली आहे:

१) विद्यार्थ्यांचे आधारकार्ड झेरॉक्स
२) विद्यार्थ्यांचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
३) जात प्रमाणपत्र
४) गुणपत्रिका
५) पालकांचा उत्पन्नाचा दाखला
६) रहिवासी दाखला
७) बँक पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत
८) शाळा सोडल्याचा दाखला
९) बोनाफाईड/शैक्षणिक शुल्क भरणा पावती

त्यानुसार छाननी केलेल्याप्रमाणे तीन प्रकारच्या याद्या तयार करण्यात आलेल्या आहेत:

| अ .क्र. | यादी | शेरा |
|---|---|---|
| १. | पात्र विद्यार्थिनींची यादी | वसतीगृह प्रवेशासाठी पात्र |
| २. | अपात्र विद्यार्थिनींची यादी | प्रवेश देता येणार नाही |
| ३. | अर्ज व कागदपत्रे त्रुटी असलेल्या विद्यार्थिनींची यादी | महाज्योती प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे अर्ज किंवा कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी ७ दिवसांची मुदत देण्यात येत आहे. |

तरी खालील अटी व शर्तीचा आधारे पात्र व अपात्र तसेच त्रुटी पूर्तता करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत:

१. मातोश्री वसतिगृहात पात्र विद्यार्थिनींना दि. १३.०७.२०२४ पासून प्रत्यक्ष प्रवेश देणेत येईल.
२. पात्र विदयार्थिनींनी आपला प्रवेश हा दि. २१.०७.२०२४ पूर्वी लेखी स्वरुपात अर्ज, वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र व प्रवेशित शैक्षणीक वर्षाचे मूळ बोनाफाईड जमा करुन निश्चित करणेत यावा. ज्या विदयार्थिनी दि. २१.०७.२०२४ पूर्वी प्रवेश निश्चित करणार नाही अश्या विदयार्थिनी या प्रवेश घेणेसाठी इच्छूक नाही असे समजून पुढील कार्यवाही करणेत येईल.अ
३. अपूर्ण कागदपत्रांअभावी अद्याप प्रवेश न दिलेल्या विद्यार्थिनीनी, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता यादी संकेतस्थळावर प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत महाज्योती विभागीय कार्यालय, नाशिक येथे प्रत्यक्ष उपस्थीत राहून करावी. विहीत मुदतीत कागदपत्रांची पूर्तता न केल्यास अश्या विद्यार्थिनी प्रवेश घेणेसाठी इच्छूक नाही असे समजून पुढील कार्यवाही करणेत येईल.
४. सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये भविष्यात काही त्रूटी/अडचणी उदभवल्यास अश्या विद्यार्थांनीचा प्रवेश हा रद्द करणेत येईल.
५. वसतिगृहात प्रवेश घेतेवेळी अद्ययावत (latest) वैदयकिय प्रमाणपत्र सादर करणेत यावे.
६. पात्र विदयार्थिनींना व त्यांचे पालकांना वेळोवेळी वसतिगृहाकडून निर्गमीत करणेत येणारे हमीपत्र हे लेखी स्वरुपात भरुन देणे बंधनकारक आहे. तसेच महाज्योती व सारथी कार्यालयाकडून वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या अटी व शर्ती पाळणे बंधनकारक राहील.
७. कोणत्याही टप्प्यावर अंतिम निर्णय घेण्याचा व त्यात आवश्यक बदल करण्याचा अधिकार हा महाज्योती संस्था प्रशासनाचा राहील व तो विद्यार्थीनीना बंधनकारक राहील.

स्वाक्षरीत /-
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व
प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर